



# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५९ वा ❑ भारतीय सौर दिनांक २० चैत्र शके १९४८, शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शालेय पडताळणीची ही वेळ योग्य नाही....

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

शालेय शिक्षण विभागाच्या वतीने नुकतेच एक पत्रक काढून इयत्ता पहिली ते अकरावी ( इयत्ता १०वी व १२ वी सोडून ) वर्गाची पडताळणी करण्याचे निर्देश शिक्षण अधिकाऱ्यांना दिले आहे.एकाच वेळी सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत एका विशेष पथकाकडून राज्यस्तरावर पडताळणी केली जाणार आहे. या पडताळणीमध्ये जर त्या पथकाला चुकीच्या पद्धतीने विद्यार्थी प्रविष्ट केल्याचे आढळून आले किंवा विद्यार्थ्यांमध्ये अनियमितता आढळली तर, सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभगांची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्राथमिक विभागाचे संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक विभागाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिला आहे.सरकारला किंवा शिक्षण विभागाला केव्हा जाग येतो. केव्हाही आदेश काढून माहिती मागण्याचे व शालेय प्रशासनाला वेठीस धरण्याचे काम शिक्षण विभाग करत आहे.. शालेय तपासणीचा काळ व वेळ न बघता एप्रिल महिन्यात भर उन्हाळ्यात की ज्यावेळी शाळा भरण्याची वेळ नियमित नसताना पडताळणीच्या आदेश काढून शिक्षकांना शालेय प्रशासनाला संभ्रमात टाकले आहे.

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यामुळे महाराष्ट्रात शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला असून, अनेक ठिकाणी शाळा सकाळच्या सत्रात (उदा. सकाळी ७ ते १२:३०) भरवल्या जात आहेत.

सर्व वर्गाच्या वार्षिक परीक्षा संपल्या असून वार्षिक नंतर विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी असते. एकदा वार्षिक परीक्षा संपली की आपल्याला सुट्टी लागली ही भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते शिक्षक वारंवार विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याची सूचना देतात वेळापत्रकात बदल करून त्यांना बोलवतात तरीदेखील विद्यार्थ्यांची उपस्थिती फारशी नसते.ही बाब शिक्षण विभागाचे लक्षात घ्यायला पाहिजे.

एप्रिल महिन्यात महाराष्ट्रात, विशेषतः विदर्भासारख्या भागात तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे जातो. यामुळे उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी अनेक पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवणे टाळतात.

१० एप्रिलनंतर साधारणपणे अनेक शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागतात. तसेच, राज्य सरकार वाढत्या उन्हामुळे एप्रिलच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यापासून सुट्ट्या जाहीर करते, ज्यामुळे उपस्थिती झपाट्याने कमी होते.

अनेक शाळांच्या वार्षिक परीक्षा मार्चच्या शेवटी किंवा एप्रिलच्या सुरुवातीला संपतात. परीक्षा संपल्यानंतर निकाल लागेपर्यंतच्या काळात विद्यार्थी शाळेत जाण्यापेक्षा घरी राहणे पसंत करतात. एप्रिल महिना सुरू झाला की अनेक कुटुंबे उन्हाळी सुट्ट्यांसाठी गावी जाण्याचे नियोजन करतात. यासाठी एसटी महामंडळ देखील एप्रिलच्या सुरुवातीपासून जादा गाड्या सोडते.

काही शाळांमध्ये एप्रिलमध्येच नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात होते. सुरुवातीच्या काळात अभ्यासाचा ताण कमी असल्याने किंवा नवीन वातावरणाशी जुळवून घेताना काही विद्यार्थी सुरुवातीला अनुपस्थित राहतात.

प्राथमिक विभागाच्या आणि माध्यमिक विभागाच्या संचालकांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२५- २६ या शैक्षणिक वर्षापासून संचमान्यता यू- डायस प्लस प्रणालीमध्ये मुख्याध्यापकांनी नमूद केलेल्या माहितीच्या आधारे नोंदी केली जाणार आहे. मुख्याध्यापकांच्या लॉग ईनवरून यू- डायस प्लस प्रणालीवर विद्यार्थ्यांची माहिती भरण्यात आली आहे. ही माहिती संचमान्यतेसाठी विचारात घेतली जाणार आहे. माहितीचे प्रमाणीकरण आणि सत्यता पडताळण्याची जबाबदारी केंद्रप्रमुख आणि गटशिक्षणाधिकारी यांची आहे,असे शिक्षण विभागाच्या आदेशात म्हटले आहे.

डायस (+) मध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी (उदा. इयत्ता दुसरी ते बारावी) देशभरातील शाळांमधील विद्यार्थ्यांची माहिती एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध होत असताना शाळा पडताळीचा अफलातून आदेश शिक्षण विभागाने आताचा का काढला? संच मान्यते वरून

विद्यार्थ्यांची अचूक संख्या, आधार नोंदणी आणि शिक्षकांची संख्या यावरून दरवर्षी होणारी संचमान्यता (शिक्षक संख्या निश्चित करणे) ठरवली जाते.सर्व माहिती अपडेट असताना पडताळणी आताच का? शिक्षण विभागाला प्रत्यक्ष भेट द्यायची असेल तर जुलै ऑगस्टमध्ये भेट देऊन पडताळणी सहजपणे करता येईल. आकडेवारी देखील सहजपणे उपलब्ध होऊ शकेल.संच मान्यतेनुसार विद्यार्थी संख्या व शिक्षकांची संख्या देखील मोजता येईल.

सध्या एप्रिल महिना सुरू असून अनेक शाळांमध्ये पायाभूत चाचणी, वार्षिक परीक्षा आणि मूल्यमापनाचे काम जोरात सुरू आहे. अशा शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस पट पडताळणी किंवा शालेय पडताळणी करणे शिक्षकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी मानसिक दडपणाचे ठरू शकते.

शिक्षण विभागाने ही पडताळणी प्रक्रिया नोव्हेंबर-डिसेंबरच्या आसपास पूर्ण करणे अपेक्षित होते, मात्र ती वर्षाच्या शेवटी घेतल्याने शैक्षणिक नियोजनावर परिणाम होत असल्याचे मत मुख्याध्यापक आणि शिक्षक व्यक्त करत आहेत.

एका बाजूला दहावी-बारावीच्या परीक्षांचे नियोजन आणि दुसऱ्या बाजूला (गुणवत्ता मूल्यांकन) यांसारख्या कामांमुळे शिक्षकांवर आधीच मोठा भार आहे. शिक्षण विभागाने ही पडताळणी जून ते ऑगस्ट या कालावधीत ठेवल्यास ती अधिक अचूक आणि सुलभ होईल, अशी मागणी अनेक स्तरांतून होत आहे.

## शालिवाहन काळात दक्षिण भारतात पहिले स्वर्णयोग-डॉ. वि. ल. धारूरकर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

छत्रपती संभाजीनगर : प्राचीन काळात दक्षिण भारतामधील पहिले सुवर्णयोग प्रतिष्ठान म्हणजे पैठण येथून राज्य करणाऱ्या शालिवाहन सम्राटांच्या काळात स्थापन झाले होते असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक माजी कुलवरून डॉक्टर विला धारूरकर यांनी व्यक्त केले.

ते शालिवाहन घराण्याचा इतिहास या विषयावर बोलत होते अध्यक्षस्थानी विवेकानंद विचार मंचचे समन्वयक श्री विजय जोग हे होते

प्रारंभी श्री मुंडे यांनी सर्वांचे स्वागत केले त्यानंतर जयंत भोयरेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला

आपल्या भाषणात धारूरकर पुढे म्हणाले शालिवाहनांनी साडेतीनशे वर्षे दक्षिणेवर राज्य केले प्रतिष्ठान हे त्यांच्या राजधानीचे शहर होते.

शालिवाहन काळात श्रीमुख हाल स्वादकर्णी पहिला स्वादकर्णी, दुसरा गौतमीपुत्र सातकर्णी वशिष्ठ पुत्र पुल माई गौतमी बालश्री इत्यादी सम्राटांनी राज्य केले यापैकी वशिष्ठ पुत्र पुलुमाई हे सर्वात समर्थ आणि पराक्रमी सम्राट होते.

आपल्या भाषणात डॉक्टर धारूरकर यांनी शालीवाहन काळात राजकीय सामाजिक आर्थिक सांस्कृतिक इत्यादी विविध क्षेत्रात झालेल्या चौफेर व क्रांतीकारक प्रगतीचा आढावा घेतला.

आपल्या भाषणात डॉक्टर धारूरकर यांनी शालिवाहन काळात महाराष्ट्रात साडेचारशे बौद्ध लेणी करण्यात आली जुन्नर नाशिक तसेच राज तडाग येथील बौद्ध लेणी याच काळात करण्यात आली, पितळखोरा हे सुद्धा सातवाहन काळातील एक सुंदर लेणे होय. डॉक्टर धारूरकर म्हणाले शालिवाहन सम्राटाने महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक या प्रदेशावर राज्य केले. या काळात



प्राकृत भाषेचा विकास झाला. हे सम्राट स्वतः एक प्रतिभाषा आणि महाकवी होते. त्यांनी लिहिलेल्या गाथा सप्तशती या ग्रंथातून सातवाहन कालीन लोकजीवनाचे चित्र उमटले आहे. तसेच गुनाठ्याच्या बृहतकथा या सुद्धा तत्कालीन जीवनाची प्रतिबिंब घडवितात.

पैठण येथे झालेल्या तीन उत्खननांचा त्याने आढावा घेतला तसेच भोकरदन, तेर येथील उत्खननांचा आढावा घेऊन ते म्हणाले उच्च दर्जाची हस्तिदंती कलाकृती या काळात निर्माण करण्यात आले. अजिंठा लेण्यातील काही महत्त्वाची लेणी सुद्धा या काळात करण्यात आली.

शालिवाहन काळात अव्वल दर्जाची पैठणी वस्त्रकला विकसित करण्यात आली, त्यामुळे इटाली व रोम येथील बाजारपेठेत सुद्धा भारताचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये सर्वश्री दौलतराव मस्के, रमाकांत जगत, हेमंत जोशी, श्री धर्माधिकारी तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते श्री बुरांडे श्री जोशी तसेच अनेक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी श्री रमाकांत जगत यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

## जांभया..... (विज्ञान कथा)

ज्योतिर्मय 📖 साहित्य

आज कृष्णा शाळेतून घरी आला.

आईने त्याचे दप्तर आणि डबा तपासून पाहिला..

''अरे वा''.. आई म्हणाली.. कृष्णा, आज डबा फस्त केलाय आणि दप्तरही स्वच्छ आहे.. कसं काय?''

कृष्णा म्हणाला, ''आई, आज ना आमच्या शाळेत स्वच्छतेचं महत्व सांगितलं आणि शाळेचं एवढं मोठ्ठं मैदान आमच्थाकडून स्वच्छ करून घेतलं, आणि आई, आपण आपलं घर आणि अंगण पण रोज स्वच्छ ठेवलं ना की आपण खूप कमी वेळा आजारी पडतो असं पण सांगितलं मोठ्या बाईंनी''

''खरंय कृष्णा, म्हणून तर आपण दर रविवारी आपलं अंगण, परसदार आणि बागेत साफसफाई करतो किनई?''

''हो गं आई खरंचच की.. पण आई, आज मी खूप म्हणजे खूपच जास्त कचरा गोळा केला मैदानावरचा.. मग बाईंनी मला खाऊ पण दिला बक्षीस म्हणून.. ''कृष्णा म्हणाला आणि आईला त्याने राजगिरा लाडूचे रिकामे पॅकेट दाखवले.

आई म्हणाली, अरे वा.. आणि एक बरं केलंस.. लाडूची रिकामी पिशवी मैदानावर फेकली नाहीस''

कृष्णा उत्साहाने म्हणाला, ''अगं असा कसा फेकेन मी आता कचरा? मला समजलंय सगळं''

हम्... छान कृष्णा, आता पटकन फ्रेश व्हा बघू..'' आईने सांगितले तसं कृष्णा उठला आणि आत पळाला.. सगळं आवरून पाच मिनिटात कृष्णा परत आला किचनमधे. आईने तोवर त्याला गरमागरम जेवण वाढलं होतं.. पोटभर जेवल्यावर आई म्हणाली, ''माझं काम आवरेपर्यंत आता तू अंगणात फिरून ये सावकाश.. मग आपण आणखी गप्पा मारू''

कृष्णा अंगणात गेला.. आणि बागेतल्या झोपाळ्यावर बसला.. थोड्याच वेळात तो तिथंच लवंडला.... झाडांच्या, पानांच्या हालचाली बघण्यात तो रमला.. दहा मिनीटात काम संपवून आई आली त्याला पडलेला पाहून आई म्हणाली, ''का रे बाळा, आज झाडा-फुलांशी बोलायचं नाही रोजच्याप्रमाणे?''

तो काही बोलणार तेवढ्यात त्याला एक मोठ्ठी जांभई आली..

आई हसली आणि म्हणाली, ''आज जांभई आली बाळाला?''



तसा कृष्णा उठून बसला आणि म्हणाला, ''जांभई म्हणजे काय गं आई?''

आई म्हणाली, '' हे काय.आत्ता तू मोठा आ करून भरपूर हवा आत घेतलीस आणि लगेचच बाहेर सोडलीस ना.. त्यालाच जांभई म्हणतात''.

लगेचच कृष्णाचा पूढचा प्रश्न तयार... ''मला जांभई का आली आत्ता?''




आई म्हणाली, ''आज एका मुलाने शाळेच्या मैदानावर खूप काम केलंय.. म्हणून त्या मुलाला कंटाळा आलाय आणि झोप ही आलीय.. म्हणून जांभई येतेय''

कृष्णाने परत एक मोठ्ठी जांभई दिली.. आणि दोघेही हसले.

कृष्णा म्हणाला, ''आता ना आई, मला जांभई आली तरी मी देणारच नाही''

आई म्हणाली, ''अरे वेड्या, तसं तर अजिबात जमणार नाही.. आपल्याला जांभई अडवताच येत नाही''

कृष्णा बुचकळ्यात पडला आणि म्हणाला, ''आई अगं, मला कंटाळा आलाय म्हणून जांभई आलीय.. म्हणजे खूप जास्त काम केलं की कंटाळा येतो आणि मग जांभई येते असंच ना?''

''अरे, फक्त कंटाळा आला किंवा झोप आली म्हणजेच जांभई येते असंच नाही काही''

''मग आणखी काय काय कारणं आहेत गं जांभई येण्याची. मला सांग ना'' कृष्णा उत्साहाने म्हणाला.

पण आईने आता त्याला दटावले आणि थोडी झोप काढ मग मी सगळं सांगेन असं म्हणून त्याचं डोकं मांडीवर घेतलं. कृष्णा थकला तर होताच आणि उठल्यावर आणखी माहिती मिळणारै म्हटल्यावर तो पटकन झोपी गेला.

तासाभराने त्याला जाग आली तेव्हा त्याची दीदी शाळेतून आली होती पण नाराज वाटत होती आणि.. आई वैतागलेली वाटत होती.. तो गुपचूप आईजवळ जाऊन बसला.

इतक्यात दीदी वहीपुस्तक काढून अभ्यासाला बसली. खरंतर ही दोघांची अंगणात खेळायची वेळ होती. तो गप्प बसून सगळं न्याहाळत होता. कुणीच कुणाशी बोलत नव्हतं इतक्यात त्याला परत जांभई आली आणि त्याला हसू आलं.. पण तो काहीच बोलला नाही.

थोडा वेळ गेला आईने नेहमीप्रमाणे कृष्णाला दूध दिलं.... तेवढ्यात एक गंमत झाली.. दीदीलाच जांभई आली.. आता मात्र कृष्णाला हसू दाबणं जमलं नाही.. तो जोरात हसला मग आईही हसली.. तिने कृष्णाला जवळ घेतलं कृष्णाने विचारलं ''आई, दीदी पण कंटाळून गेलीय म्हणून तिला जांभई आली ना?''

आईने दीदीला जवळ घेतलं आणि म्हणाली...'' नाही, दीदीला शाळेतून आल्याआल्या लगेच टीव्ही पहायचा होता मि नाही म्हटलं.. म्हणून दीदी रुसली आणि रागावून अभ्यासाला बसली... तिच्या मनाविरुद्ध अभ्यास करावा लागत असल्याने तिला जांभई आली''

''अच्छा.. म्हणजे मनाविरुद्ध काम करावं लागलं तरी जांभई येते तर... ''कृष्णा म्हणाला.

''हो तर.. शिवाय एकच काम करत बसावं लागलं ना खूप वेळ तरीही जांभई येते.. ''आई म्हणाली.

''आई, नक्की काय होतं गं जांभई येते म्हणजे?'' कृष्णाचा पुढचा प्रश्न..

आई सांगणार तोच दीदी म्हणाली... ''आई मी सांगू?.. मला शाळेत शिकवलंय''

पुढे दीदी सांगू लागली, ''आपण जेव्हा जांभई देतो तेव्हा कार्बन डायऑक्साईड बाहेर सोडतो आणि नेहमीपेक्षा जास्त ऑक्सिजन आपण आत घेतो... ऑक्सिजन म्हणजेच प्राणवायू.. प्राणवायूचा पुरवठा कमी झाला तरी जांभई येते. खरंतर बरेचदा जांभई दिल्यावर नवी गोष्ट करायला आपण फ्रेशच होत असतो. हो किनै गं आई?''

आई म्हणाली, ''अगदी बरोबर!''

तितक्यात तिघांचेही लक्ष सोफ्यावर पहुडलेल्या मनीकडे गेले.. तीही जांभई देत होती.. ते पाहून तिघे जाम हसले.. कृष्णाला तर खूप हसू आले.. आणि त्याला हेही लगेचच समजले की आपल्याप्रमाणेच प्राण्यांनाही जांभया येतात.

''आई, आज झोपताना मला प्राण्यांची जांभई कशी असते ते नेटवर दाखव हं..''

असं म्हणत कृष्णा खेळायला पळालासुद्धा.

***





गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.


शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.

सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.

त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




## जात्यावरच्या ओव्या......

आला सण आखाजीचा
आंबे ओटी भरून पिकले
आम रसाचा पाहुणचार
मुर्हाळी मुक्कामाला आले ||५८४||

आला सण आखाजीचा
गौराई नटली, सजली
वेणी, फणी, नथ, काप
पैजणावाचून रूसली ||५८५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १७




**ज्योतिर्मय साहित्य**

मनी मानव व्यर्थ चिंता वाहाते ।
अकस्मात होणार होऊनि जाते ।
घडे भोगणे सर्वही कर्मयोगे ।
मतीमंद ते खेद मानी वियोगे ।।१७।।

अर्थ : संसारात माणूस अनेक व्यर्थ चिंता करत बसतो. परंतु जे घडायचे असते ते अकस्मात घडूनच जाते. कारण प्रत्येकाला आपल्या कर्मानुसार सुखदुःख भोगावे लागते. हे सत्य काही लोकांच्या लक्षात येत नाही आणि ते मात्र त्याबद्दल सतत दुःख करत राहतात.

विवेचन :

आधीच्या श्लोकात आपण गेलेल्या व्यक्तीचा जो शोक करतो, तो शोक मोह किंवा लोभातून निर्माण होतो असे समर्थ सांगतात. या श्लोकात ते पुढे एक वेगळाच पैलू उलगडतात. माणूस आपल्या आयुष्यात अनेक प्रकारच्या चिंतांनी त्रस्त असतो. परंतु चिंता करून फारसा उपयोग नसतो, कारण जे घडायचे आहे ते कर्मानुसार घडणारच असते.



माणसाचे आयुष्य चिंतांनी भरलेले असते. चिंता नाही असा दिवस फार क्वचितच येतो. विद्यार्थ्याला परीक्षेत उत्तीर्ण होऊ की नाही याची चिंता असते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर नोकरी मिळेल की नाही याची काळजी वाटते. पुढे लग्न होईल की नाही, संसार कसा होईल, मुलं चांगली निघतील का, म्हातारपणी आपली काळजी कोण घेईल ?अशा अनेक चिंता माणसाला जन्मापासून मृत्यूपर्यंत सतावत असतात. या चिंतेच्या ओझ्याखाली तो आयुष्य जगत राहतो.

परंतु समर्थ सांगतात की अशा प्रकारची व्यर्थ चिंता करण्याचा काही उपयोग नाही. कारण आपल्या आयुष्यात जे काही घडते ते आपल्या कर्मानुसारच घडत असते. आपले कर्म चांगले असेल तर त्याचे चांगले फळ मिळते, आणि दुष्कर्म केले असेल तर त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. बाभळीचे झाड लावून आंब्यांची अपेक्षा करणे जसे व्यर्थ आहे, तसेच दुष्कर्म करून चांगल्या परिणामांची अपेक्षा करणेही व्यर्थ आहे. महाभारतातील दुर्योधन आणि दुःशासन यांनी नीतीने वागणाऱ्या पांडवांविरुद्ध अनेक कटकारस्थाने रचली. त्या दुष्कृत्यांचे परिणाम त्यांना भोगावे लागले आणि अखेर महाभारताच्या युद्धात संपूर्ण कौरववंश नष्ट झाला. कर्माच्या नियमानुसार फळ मिळते याचे हे ठळक उदाहरण आहे. **(क्रमशः)**




## भगवंताच्या संयोग-वियोगातच खरे सुख दुःख आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

हल्ली लोकांचे हित करण्यासाठी जो तो झटत असतो, पण आपले स्वतःचे हित साधल्याशिवाय दुसऱ्याचे हित आपण काय साधणार? ज्याला स्वतःला सुधारता येत नाही, तो दुसऱ्याला काय सुधारणार ? त्यालासुद्धा अभिमानच आड येतो, कारण त्याला वाटते, ' आपण दुसऱ्याचे हित करून देऊ.' या अभिमानाने तो फुगलेला असतो. अहंकार जाण्यासाठी साधनच करावे लागते, आणि ते साधन गुरू सांगत असतात. म्हणून, त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागले म्हणजे आपले हित होते. ब्रह्म हे काही कुठे शोधायला जावे लागत नाही. ते आपल्या जवळच असते; पण ते दुसऱ्याने आपल्याला दाखवावे लागते. हेच काम सद्गुरू करीत असतात. श्रीकृष्ण प्रत्यक्ष परब्रह्म, अवतार घेऊन वसुदेवाचे पोटी आले. परंतु, वसुदेव त्यांना आपला मुलगाच समजत होते तोपर्यंत, प्रत्यक्ष परमात्मा घरी असूनही ओळख पटली नाही. तेच, नारदांनी जेव्हा त्यांना सांगितले की, ' श्रीकृष्णाला आपला मुलगा न समजता तो परब्रह्म आहे असे समजा म्हणजे तुमचे हित होईल, ' तेव्हा खरी ओळख पटली. तसेच, राम अवतारी असूनही, वसिष्ठांनी जेव्हा सांगितले की, ' तूच प्रत्यक्ष परब्रह्म आहेस, ' तेव्हाच त्याला ते ज्ञान झाले. आता हे जरी केवळ आपल्याला दाखविण्याकरिता असले, तरी त्याचा अर्थ हा की, गुरूने दाखविल्याशिवाय तो परमात्मा भेटत नाही. गुरू तरी काय सांगतात ? नामस्मरण हेच साधन म्हणून ते सांगतात. ते दिसायला जितके सोपे तितकेच करायला कठीण असते; ते कठीण आहे म्हणून सोडून देऊ नये. आपण देवाला शरण जाऊन साधन करायला लागावे. म्हणजे ते करायला तो परमात्मा शक्ती देतो.

जगात खरे सुख नाही आणि दुःखही नाही. जगात सुखदुःख आहे असे जे आपल्याला वाटते ते अपुरे आहे; ते तात्पुरते आहे. खरे सुखदुःख भगवंताच्या संयोग-वियोगामध्येच आहे. खरे पाहता आपली बुद्धी लवचिक आहे; आपल्या वृत्तीवर कशाचाही परिणाम होतो. म्हणून आपल्या मागे भगवंताचा आधार हवा. आपण त्याचे आहोत, आणि जे जे होते ते त्याच्या इच्छेने होते, असे समजून वागावे. भूक लागली तर आईजवळ खायला मागावे, पण चोरी करू नये; तसे पोटापुरते भगवंताजवळ मागावे, पण जास्त मागू नये. भगवंत अत्यंत जवळ आहे आणि अत्यंत दूरही आहे. तसाच तो सर्वव्यापी आहे. म्हणून तो आपल्याला दिसत नाही. आपण दरवर्षी भगवंताचा जन्म करतो; याचा अर्थ असा की, मागच्या वर्षी आपण जन्म केला हे विसरलो, म्हणून या वर्षी पुनः त्याचा जन्म करावा लागला ! खरे म्हणजे भगवंताचा वाढदिवस करायला पाहिजे. भगवंत काल होता, आज आहे, आणि उद्या राहणारच; म्हणून त्याचा खरा वाढदिवस होऊ शकतो. भगवंताचे अस्तित्व आपण जागृत ठेवले, तर दरवर्षी जास्त उत्साह वाढेल आणि आनंदाचा वाढदिवस होईल.

रामनाम जाणा अक्षरे दोन । गुरूमुखे करावी ओळखण ।।

****

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे......
ध्रुवाला वडिलांच्या मांडीवर बसायचे होते. सुरूचिला हे पटले नाही. सु रुचीचे व ध्रुव (स्थिरता) कधी जमत नाही.वडिलांच्या मांडीवर बसायला तुला माझ्या पोटी जन्म घ्यायला पाहिजे होते. ध्रुव रडत रडत आईकडे गेला. सुनिती कांहीं बोलली नाही. नंतर ती म्हणे अरे तुझी सुरुची आई काय चुकीचे बोलली? ती वडिलांची लाडकी आहे. नैतिक विचाराची गंमत अशी असते की जी परिस्थिती आहे ती स्वीकारली पाहिजे. आपण लगेच तक्रार करतो. आपण स्वीकार करीत नाही परिस्थिती बदलण्याचा विचार, प्रयत्न आपण करीत नाही. नेमके इकडे दुर्लक्ष केल्या जाते.परिस्थिती स्वीकारून जो अल्प लाभ झाला त्यात संतोष मानाने गरजेचे असते. आमच्या चुकांचे खापर दुसऱ्याच्या माथी फोडणे हेच आपण करतो. कधी कधी आपलेच प्रारब्ध प्रतिकूल असते.

सुनीतीने प्रतिकूल परिस्थितीत केलेला हा विचार परमेश्वर प्राप्ती साठी योग्य आहे. प्रतिकूल परिस्थिती ही पारमार्थिक अनुकूलता असते.ध्रुवास ती इकडे लक्ष न देता योग्य स्थान मिळविण्या साठी भगवंताकडे जावे असा सल्ला देते. तो अरण्यात परमात्मा शोधायला गेला.ध्रुवाचे वय लहान होते.त्याला नारद भेटले ते म्हणाले अजून तू लहान आहेस, तू मिठाई खावी, खेळावे बाळगावे. अरण्यास हिंस्त्र पशु असतात. नारदाना त्याच्या इच्छेची तीव्रता किती आहे याची परीक्षा घ्यायची होती.तो बिचकला नाही. त्याने कठोर तप आरंभिले. हे करताना प्रतिबंध येणार, त्रास होणार. तप सुरू केल्या बरोबर लगेच भगवंत दर्शन देत नाहीत.

गडबड करणाऱ्यांना, आत्मस्तुतीत अडकणाऱ्याला व गुरु सेवा न करणाऱ्याला विद्या मिळत नाही.

तीन तीन दिवसानंतर एक बोर किंवा कवठ(खाली पडलेले) खायचे. परमात्मा संतुष्ट झाले नाहीत.

क्रमश.......

## सुविचार - प्रकाश

प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230




♦
संवेदनशीलतेची गंगा म्हणजेच
श्यामची आई
प्राणिमात्रांवर प्रेम करायला सांगते
श्यामची आई
ती केवळ श्यामचीच आई नव्हे तर
सर्व संवेदनशील व्यक्तीची आई आहे
श्यामची आई

♦
मदर तेरेसा बाबा आमटे आदर्श मानूनी
माणुसकीची कास धरावी
अनाथ दिव्यांगाची सेवा करूनी
संवेदनशीलता मनामनात रुजवावी




## जिरा पावडर आणि दूध

**ज्योतिर्मय साहित्य**



जिरा पावडर आणि दूध एकत्र प्यायल्याने पचन सुधारते, वजन कमी होण्यास मदत होते, झोप चांगली लागते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि त्वचेचे आरोग्य सुधारते. हे एक प्रभावी आयुर्वेदिक उपाय आहे, जे तणाव कमी करते आणि शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करते.

मुख्य फायदे

पचन सुधारते:

जिऱ्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि गॅस, ॲसिडिटी यांसारख्या समस्या कमी होतात.

वजन कमी होण्यास मदत:

हे मिश्रण चयापचय वाढवते, ज्यामुळे कॅलरीज बर्न होतात आणि वजन नियंत्रणात राहते.

चांगली झोप:

कोमट जिरे दुधात मिसळल्यास मज्जासंस्था शांत होते, तणाव कमी होतो आणि शांत व गाढ झोप लागते.

रोगप्रतिकारशक्ती वाढवते:

जिऱ्यामध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

त्वचेचे आरोग्य:

हे मिश्रण त्वचेचे आरोग्य सुधारते आणि त्वचा चमकदार बनवते.

शरीर डिटॉक्सिफाय करते:

जिरा शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते, ज्यामुळे शरीर डिटॉक्सिफाय होते.

कसे वापरावे

एक कप कोमट दुधात एक चमचा जिरा पावडर मिसळा आणि झोपण्यापूर्वी प्या.

इतर फायदे

जिरा आणि दुधात कॅल्शियम, पोटॅशियम आणि लोह यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक असतात.

हे मिश्रण सर्दी-खोकल्यामध्ये देखील फायदेशीर ठरू शकते, कारण यात जिऱ्यामुळे आराम मिळतो.

***



## लघु बोधकथा

### ♦अहंकाराचा त्याग♦

एका राजाला दोन मुले होती. मोठा अहंकारी आणि लोभी होता तर धाकटा परोपकारी होता. राजाच्या मृत्युनंतर त्याचा मोठा मुलगा गादीवर बसला. त्याने प्रजेवर खूप अन्याय, अत्याचार करणे सुरु केले पण छोटा सहृदयी असल्याने तो प्रजेमध्ये सुप्रसिद्ध होता. त्याने लोकांना गुपचुपपणे मदत केलेली एके दिवशी मोठ्या भावाला कळाली, मोठा भाऊ म्हणाला," मी राजा असताना तू माझ्या परवानगीशिवाय तू लोकांना मदत करत आहेस हे मला आवडत नाही." त्याचे बोलणे पूर्ण झाल्यावर छोटा म्हणाला,"मी माझे कर्तव्य करत आहे." तेव्हा मोठ्या भावाने त्याला एक जमिनीचा एक छोटा तुकडा दिला आणि महाल व राज्यावरील सर्व अधिकार काढून घेऊन त्याला राज्यातून हाकलून दिले. छोट्याने आदेशाचे पालन केले. तेथे त्याने स्वत:साठी खोली बांधली. त्यावर आंब्यांची रोपे लावून आमराई तयार केली. त्याची देखभाल केली. झाडाला लवकरच आंबे लागले. त्या मार्गाने कोणी जात असेल तर त्यांना तो आंबे खाऊ घालत असे. उपाशी वाटसरूंच्या या निस्वार्थ सेवेमुळे त्याची लोकप्रियता पुन्हा वाढली. अहंकारी राजाने त्याचे बघून तशीच आमराई तयार केली पण काही केल्या त्याच्या आंब्यांच्या झाडांना आंबेच लागेनात. त्याने संतमहात्मे, जाणकारांना विचारले तेव्हा एका संताने त्याला सांगितले की, त्या झाडांनासुद्धा परोपकाराची भाषा कळते म्हणूनच त्याच्या झाडांना आंबे लागतात. तुझ्या झाडांवर अहंकाराची छाया आहे तू परोपकाराची जोड दे मग आंब्यांनी तुझे झाड बहरेल. राजाने संताच्या बोलण्याप्रमाणे अहंकार सोडून देऊन सदाचाराचा मार्ग पत्करला.

तात्पर्य : परोपकार केल्यानेच मनुष्यजन्म सफल होणार आहे.

# चैत्रांगण...

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या मराठी वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासून होते. हा चैत्र महिना म्हणजे वसंत ऋतुच्या आगमनाचा महिना. या दिवसात वातावरणातील गारवा कमी होऊन उष्णतेला सुरुवात होते. उन्हाळ्यात झाडांची सर्व पाने गळून पडतात. या वसंत ऋतूत झाडाना नवीन पालवी फुटते. कैऱ्या येण्यास सुरुवात होते. प्रतिपदेला गुढी उभी करून नवीन वर्षाचे आनंदात स्वागत केले जाते. मग तृतीयेला चैत्र गौरीचे आगमन होते. तिला थंड चंदन लावले जाते. कैरीची डाळ, थंडगार पन्हे, टरबूज, खरबूज, काकडी, बत्तासे असे सगळे थंड पदार्थ तिला उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून आवर्जून केले जातात. तिला खाण्यासाठी लाडू, करंजी, शेव, शंकरपाळी असे फराळाचे पदार्थ सुद्धा बनवतात. राम नवमी, हनुमान जयंती असे उत्सव सुद्धा याच चैत्र महिन्यात येतात. वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षयतृतीयेला आमरस, पुरणपोळी, खीर, कानवला खायला घालून तिची पाठवणी केली जाते.

आपल्या संस्कृतीत रंगीबेरंगी रांगोळीला खूप महत्वाचे स्थान आहे. पूर्वी सर्वांची सकाळ दारातील गोमयाने स्वच्छ सारवलेल्या अंगणातील, तुळशीसमोरील, चुलीवरील, उंबरठ्यावर, देवापुढे रांगोळ्या काढण्यापासूनच व्हायची स्त्रियांची. इतके प्रसन्न, मंगलमय वाटते रंगीबेरंगी सुंदर रांगोळ्या पाहून. त्यातून स्त्रियांचे कौशल्य दिसायचे. जितकी रेख बारीक, एकसारखी येते, तितकी रांगोळी आकर्षक दिसते.

काही विशिष्ट सणावारांना विशेष रांगोळ्याही काढल्या जातात. जेवणाच्या ताटा भोवती पण सुन्दर रांगोळी काढली जाते, त्यामुळे जेवताना मन प्रसन्न होते. काही चिन्हे खूप शुभ मानली जातात, ती दररोजही काढली जातात. पूर्वी खेड्यापाड्यातून साप, विंचु, नाग असे नेहमीच अंगणात, अंधाऱ्या, अडचणीच्या ठिकाणी थंडगार वळचणीला सापडायचे. असे म्हणत, की रांगोळी काढलेली असली की ती ओलांडून त्याला घरात येणे जमत नाही म्हणून त्यांना प्रतिबंध व्हावा म्हणून पण मोठ्या मोठ्या रांगोळ्या काढत असत.

चैत्रांगण रांगोळी ही महाराष्ट्रातील चैत्र महिन्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि सांस्कृतिक परंपरा आहे, जी गुढीपाडव्यापासून ते अक्षय्य तृतीयेपर्यंत अंगणात काढली जाते. ही रांगोळी सूर्य, चंद्र, स्वस्तिक, कलश, गोपद्म अशा ३३ शुभचिन्हांनी बनलेली असते, जी घरात सुख, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जा आणते, असे मानले जाते. यातून आपली संस्कृती, कला आणि आध्यात्मिकता दिसते.यामध्ये प्रामुख्याने सूर्य-चंद्र, दोन गौरी, स्वस्तिक, कमळ, शंख, चक्र, गदा, पाच कोळ्यांची आकृती (पंचेंद्रिये), तुलसी वृंदावन, कलश, त्रिशूळ इत्यादी चिन्हे काढली जातात. ही रांगोळी घरात चैतन्य पसरवते. यातील प्रतीके वास्तूतील दोष दूर करतात आणि समृद्धी वाढवतात,




असे मानले जाते. परंपरा म्हणजे केवळ कला नसून भारतीय संस्कृतीतील निसर्ग आणि देवतेचे स्वागत करण्याचा एक सुंदर मार्ग आहे. 'चैत्रांगण' हा रांगोळी प्रकार कला कौशल्य दर्शवतो त्यामुळे तो वैशिष्ट्यपूर्ण आहे.चौकोनात एका मखरामध्ये दोन गौरी काढतात. त्यांना पार्वती व तिची सखी समजतात. तिच्या दोन बाजूंला सूर्य व चंद्र काढतात. सूर्य हा कायम प्रकाशमान, निसर्गचक्राचा एक अविभाज्य घटक; तर चंद्र शीतल. सूर्य-चंद्रांमुळे ही सृष्टी कायम प्रकाशू दे, असे त्यातून सुचवायचे असावे. देवीच्या बाजूला दोन पंखे उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून आणि मखरात देवीला बसण्यासाठी दोन पाटही काढतात.

॥ आपली संस्कृती ॥
सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
मो. 95034 34424



शंख, चक्र, गदा व पद्म ही देवतांची आयुधे आणि हत्ती, गरुड ही त्यांची वाहनेही त्यात काढली जातात. रांगोळीत गाय, नाग यांना शेतीमुळे महत्त्व तर कासवाप्रमाणे सर्व जाणिवा आत घेऊन नंतर देवदर्शन करावे हे सुचवण्यासाठी त्या जलचरांचाही समावेश होतो. गोपद्मामुळे गायीचे स्मरण आणि हत्ती म्हणजे गजांतलक्ष्मी ऐश्वर्याचे, सामर्थ्याचे प्रतीक. तीक्ष्ण नखे व दृष्टी, धारदार चोच यांच्या सहाय्याने भक्ष्याला अचूक टिपणारा गरुड हे श्रीविष्णूचे वाहन म्हणून ओळखला जातो. स्वस्तिक हेही शुभचिन्ह, ते सात्त्विकता, आनंद व मांगल्य यांचे प्रतीक आहे. म्हणून तर ती शुभचिन्हे चैत्रांगणात समाविष्ट झाली असावीत. 'अज्ञानरूपी चिखलातून कमळ फूलू दे' ही भावना आहे. या चैत्रांगणात विद्येची देवता सरस्वती, तुळस, वृंदावन, ॐ, आंबा, उंबर, पिंपळ यांबरोबरच कलशही दाखवतात. शुभचिन्ह व धार्मिक कामात कायमच लागणारा नारळही तेथे असतो. रांगोळीत मोर व पोपट हे पक्षी काढतात. गौर चैत्रात महिनाभर घरोघरी बसते. त्यामुळे चैत्रांगणात फणी, करंडा, आरसा, मंगळसूत्र, कंगवा ही सौभाग्यचिन्हे असतात. लक्ष्मीच्या पावलांसोबत पाळणा व तिचे बाळही असते. ते वंशवृद्धीचे प्रतीक आहे. शंकराची त्रिशूळ, डमरू ही वाद्ये, तर त्यांना प्रिय असलेले बेलाचे पान त्यात काढले जाते. अशा प्रतीकरूपी अनेकविध चित्रांनी साकारलेले चैत्रांगण अंगणात शोभून दिसते. उत्साही वातावरणातील वसंतोत्सव चैत्रांगणाने अधिक आनंदी होऊन जातो.पूर्वी लहान मुली, नवीन नवऱ्या लहान वयाच्या असायच्या. त्यांना सकाळी प्रसन्न, आनंदी वाटावे, वेळ छान जावा, आणि त्यांच्यातील कला सर्वांना दिसावी, मग त्यांचे कौतुक झाले की त्या आनंदी व्हायच्या, म्हणजे साऱ्या घरातील वातावरणच प्रसन्न व्हायचे म्हणून मुलींना रांगोळ्यांची आवड असायची.

पण आता काळाप्रमाणेच बरेच बदल घडत आहेत. जीवन, राहणीमान सारेच बदलले आहे. घरे छोटी आणि फ्लॅट्स झाले. त्यामुळे मोठ्या रांगोळ्या काढायला जागाही नाही, आणि धावपळ, नोकऱ्या, डबे यातून रांगोळी काढण्यासाठी वेळ पण मिळत नाही. त्यामुळे आता दारापुढे अगदी छोटीशी रांगोळी काढली जाते. पाश्चात्य संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाने ते सुद्धा काही ठिकाणी दिसत नाही. पण ज्यांना खरंच आवड आहे, आपली संस्कृती जपण्याची मनापासून इच्छा आहे, संस्कृतीचा अभिमान आहे, त्यांच्यासाठी वेळ नसला तर खूप सोयी झाल्या आहेत. अगदी छोट्या पासून ते मोठ्या रांगोळ्या पर्यंत आता साचे सर्वत्र अगदी सहज आणि स्वस्तात उपलब्ध असतात. त्यामुळे झटपट आणि सुबक, सुरेख, रेखीव, रंगीबेरंगी रांगोळ्या अगदी सहज कोणीही काढू शकतात. आता तरी प्लास्टिकच्या तुकड्यावर फेव्हिकॉल लावून काढलेल्या सुरेख आकर्षक आकारातील रांगोळ्याही मिळतात बाजारात. इच्छा असली की मार्ग दिसतोच. लोकांच्या गरजा ओळखून तसे प्रोडक्ट्स बनवून ती बाजारात आणली जातात. त्यामुळे ग्राहक, विक्रेता दोघांचाही फायदा झाल्यामुळे दोघेही खुश होतात. बेरोजगारांना काम, पैसे मिळतात. त्यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होतो. चला मग, काढणार ना तुम्हीही आता चैत्रांगण? आजच्या आधुनिक जीवनशैलीतही ही परंपरा आपल्याला आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवते. चैत्रांगणामुळे लहान मुलांनाही आपल्या संस्कृतीची ओळख होते आणि त्यांच्यात सर्जनशीलतेची जाणीव निर्माण होते.

म्हणूनच, आपण सर्वांनी ही सुंदर परंपरा जपून ठेवावी आणि पुढील पिढीकडेही ती प्रेमाने सुपूर्त करावी. चैत्रांगण हा आपल्या संस्कृतीचा एक अनमोल वारसा आहे. त्याचा अभिमान बाळगुन तो कायम जपलाच पाहिजे.

# सिडको एन-२ जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी कोमल रंधे पाटील, उपाध्यक्षपदी मल्हारराव नाचण डोणगांवकर यांची निवड

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सव सिडको एन-२, छ. संभाजीनगर पदाधिकाऱ्यांची बैठक श्री. कल्याण रंधे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे घेण्यात आली. यावेळी बैठकीत उत्सव समितीचे अध्यक्षपदी कोमल रंधे पाटील तर उपाध्यक्षपदी मल्हाहराव नाचण डोणगांवकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. इतर कार्यकारणी पुढीलप्रमाणे- कार्याध्यक्ष भास्कर लिहिणार, सचिव ज्ञानेश्वर खंदारे, स्वागताध्यक्ष दरशरथ मानवतकर, उपाध्यक्ष मल्हाहराव नाचण डोणगांवकर सहसचिव आर. यु. हनवते, कोषाध्यक्ष दिलीप खरात, मार्गदर्शक जयमलसिंग रंधवा, रमेश मुळे अण्णा, मोहन जगताप, बाळू पवार, नामदेव गायकवाड, अण्णा इंगोले, प्रकाश जाधव, रवी तावडे (नगरसेवक)



# वस्तू वस्तू जपून ठेव...




## कॅसेट (ध्वनीफीत)

आज घर आवरताना एक जुनी कॅसेट सापडली आणि त्या फितीप्रमाणेच मनही भूतकाळातील आठवणींत गुंडाळले गेले. माझ्या लहानपणी ज्यांच्याकडे रेडिओ, टेप-रेकॉर्डर, टीव्ही असेल किंवा घरात नळ, गॅस आणि झोपायला गादी-कॉट असेल, तर त्या घराकडे 'फार श्रीमंत' लोक म्हणून बघितले जायचे. "त्यांचे काय बाबा, मोठे लोक आहेत ते!" असा एक विशिष्ट आविर्भाव त्यामागे असायचा.

अशा काळात एके दिवशी वडिलांनी एक मोठा बॉक्स घरी आणला. (आमच्यासाठी बॉक्स उघडणे ही सुद्धा एखाद्या दिवाळीपेक्षा कमी नसे!) तो बॉक्स उघडताना वाड्यातील सगळे 'बालवीर' तिथे जमले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद आणि कमालीची उत्सुकता होती. मोठी माणसे कडेकडेने उभी होती. त्यातील स्त्रियांच्या चेहऱ्यावर संमिश्र भाव होते —कौतुक, थोडी असूया, प्रचंड उत्सुकता आणि थोडी हळहळ! अखेर विविध सूचनांच्या भडिमारानंतर तो बॉक्स उघडला गेला आणि आतून एक मस्त काळा, चमकदार, अनेक बटणे असलेला 'पाहुणा' घरात प्रविष्ट झाला. तो म्हणजे 'टू-इन-वन'.प्रथम त्यातले काहीच कळेना, पण हळूहळू त्या पाहुण्याशी परिचय वाढत गेला आणि नवनवीन गुपिते कळू लागली. रेडिओ तसा ओळखीचा होता, पण त्यातील 'कॅसेट प्लेअर' ही गोष्ट अगदीच नवीन होती. कॅसेट आत कशी फिरते, याचेही तासनतास निरीक्षण झाले. त्यातून येणारा आवाज आणि आपल्याला हवी तीच गाणी लावता येणे, हे सर्व जादू वाटण्यासारखे होते.

पण माझे बालकुतूहल मला शांत बसू देईना! या कुतूहलापोटी घरात कोणी नसताना अनेक वस्तू खोलून पाहण्याचे 'प्रताप' मी केले आहेत.

ती कॅसेट नेमकी वाजते कशी? मग एकदा संधी साधून मी ती उलट-सुलट करून पाहिली. तिला 'A' आणि 'B' अशा दोन बाजू असतात आणि दोन्हीकडे वेगळी गाणी कशी वाजतात, हा माझ्यासमोर मोठा प्रश्न होता. अशाच एका गाफील क्षणी त्यातील काळी रिबन बाहेर आली! आता नक्की ओरडा मिळणार, या भीतीने मी घामाघूम झाले. पण शक्कल लढवून कॅसेटच्या चाकात करंगळी घातली, ती गोल फिरवली आणि रिबन हळूहळू आत गेली. तेव्हा कुठे माझा जीव भांड्यात पडला.

नंतर समजले की आपल्याला हव्या त्या गाण्यांच्या कॅसेट्स दुकानात मिळतात. मग काय, एक कोरी कॅसेट घ्यायची, घरातील सर्वांनी एकत्र बसून आवडीच्या गाण्यांची यादी करायची आणि ती दुकानदाराकडे द्यायची. हा एक नवा खेळच सुरू झाला. जुनी गाणी पुसून नवीन गाणी भरता येतात, हे समजल्यावर तर आनंदाला पारावार उरला नाही. त्यावेळी 'TDK' आणि 'SONY' च्या कॅसेट्स सर्वात उत्तम असतात, हे तांत्रिक ज्ञानही मिळाले. पु.ल. देशपांडे, व.पु. काळे, शंकर पाटील यांचे कथाकथन आणि गाण्यांचे कार्यक्रम या कॅसेट्समुळे थेट घरात अवतरले. "एकदा घ्या आणि पुन्हा पुन्हा ऐका" या सुविधेमुळे रेडिओच्या सवयीच्या लोकांना स्वतःच्या बोटावर आवडते गाणे वाजवताना राजेशाही थाट वाटायचा.


आनंदात गाणी ऐकणे चालू असताना अचानक 'खटक' असा आवाज होऊन टेप बंद पडायचा. मग सर्वांची नजर संशयाने माझ्याकडे वळायची. मी आपला शक्य तितका 'बावळट' चेहरा करून, "मी तर आज टेपला हातही लावला नाही," असे पटवून द्यायचे. कॅसेट बाहेर काढली की त्यातून लांबच लांब रिबन बाहेर आलेली असायची. तिथे माझा जुना अनुभव उपयोगी पडायचा; फक्त यावेळी करंगळीऐवजी पेन्सिलचा वापर करून ती रिबन गुंडाळून पुन्हा आत बसवली जायची. एकदा तर रिबन तुटलीच! पण सेलोटेपचा बारीक तुकडा लावून ती जोडण्याचे धाडस मी केले आहे. हे काम ज्यांनी केले असेल, त्यांना एखादा सर्जन ऑपरेशन करताना किती टेन्शनमध्ये असतो, याचा नक्कीच अनुभव आला असेल.

आज काळ बदलला आहे. आता सगळं काही 'ढगात' (Cloud) आहे, 'तू-नळी' (YouTube) आहे आणि आपले गुगल बाबा तर आहेतच! एका क्लिकवर हवे ते गाणे मिळते आणि प्रत्येकाच्या कानात हेडफोन्स असतात. पण त्या काळी गाण्यांचा आणि जेवणाचा 'मेन्यू' एकत्र ठरायचा. त्या सहभोजन आणि सहश्रवणात जी सामूहिक मजा होती, ती केवळ त्या काळातील पिढीलाच ठाऊक!

आज त्या एका जुन्या कॅसेटमुळे तो सगळा काळ डोळ्यांसमोरून पुन्हा एकदा झरझर फिरून गेला.

विभावरी कुलकर्णी
8087810197

## एकांकिका
# मायेचा ओलावा



लेखक - अरुण वि.देशपांडे, पुणे, मोबाईल- 9850177342

कालच्या अंकावरून पुढे......

■ दीदी -(फणकार्याने)- भाई, कंट्रोल कर, काही पण नको बोलू हां, आता मारे बाबांच्यासमोर डेअरिंग करतोय, उद्यापसून पुन्हा ,माझ्याशी गाठ आहे तुझी, बच्चू सांभाल के रहो.

■ आई- (काळजीच्या सुरात )
आपल्या समोरच दिदीची अशी ही ताईगिरी" पाहून मला तर बाई फार काळजी वाटते यांच्या वागण्याची.

■ बाबा- (खेळकर मूडमध्ये )- डोन्ट वरी मॉम, हे बहीण-भाऊ वयाने फार मोठे नाही झालेत अजून, बाचाबाची, दंगा-मस्ती, चालयचीच
हेच बहीण-भावाचे प्रेम समजायचे.

■ आई- (गंभीर स्वरात)- अहो तसे नाहीये ना, म्हणून तर मला सारखी काळजी वाटत असते.

■ बाबा- (समजावण्याचा स्वरात)-धीर सोडू नकोस , होईल सगळं ठीक. आपली मुलं मोठी व समजूतदार होतील.

■ भाई- हे हो काय आई-बाबा, छान गप्पा तर राहिल्या बाजूला, इतकं सिरीयस होऊन नका ना बोलू.

■ दीदी- बाबा, ही आईच नेहमी अशी बोलते, तिला वाटते तिची मुलगी जगातली सगळ्यात वाईट मुलगी आहे, जी सतत तिच्या लाडक्या मुलाला त्रास देत असते.

■ आई- स्वानंदी, अग तू देखील लाडकीच पण, खरं सांग- तू मोठ्या बहिणीसारखी वागतेस का ?

■ दीदी- स्टॉप हं आई, तू असेच बोलणार असलीस तर, मला नको नाश्ता, जाते मी माझ्या रुममध्ये.

■ भाई- दीदी, सॉरी, नाश्ता न करता जाऊ नकोस,

■ दीदी- चूप रे खोटारड्या, माझ्या संडे मुडचा पचका झाला की पोटात गुदगुल्या होतात तुझ्या,
आय नो ..!

■ आई- दिदी, असा आक्रस्ताळेपणा करून
माझीच दमकोंडी करीत असतेस,
माझी काळजी कधी समजूनच घेत नाहीस तू .

■ बाबा- हे काय चालू आहे ? पुरे करा बरं,
चहा आणा, नि चहाच्या पेल्यातलं वादळ थांबवा.

■ भाई- दिदी तू कर ना, बाबांच्या आवडीचा चहा

■ दीदी- ए भाई, उगीच मस्केबाजी नको करू,
मी चहा घेत नाही, मी चहा करत ही नाही,
(दीदी रूममध्ये निघून जाते)

■ आई- अहो, आता सांगा तुम्हीच,
मी काळजी करू नको तर काय करू?

■ बाबा- (हताशपणे)- तू म्हणतेस त्यात तथ्य आहे, यापुढे आपण लक्ष दिलेच पाहिजे
या बहीण -भावाकडे

■ आई- आठवडाभर आपण दोघेही ऑफिस टेन्शनमध्ये,
दिवसभर ही बहीण-भाऊ
एकमेकांच्या सोबत कशी रहात असतील, ?
याचीच धास्ती मनात असते.

■ भाई- आई, बाबा नका काळजी करू, मी दिदीच्या मनाविरुद्ध वागतच नाही.

■ आई- अरे भाई, मला माहिती आहे हे, प्रॉब्लेम तर हाच आहे की, ती कुणाच्याच मनासारखे वागत नाहीये.

■ बाबा- पुरे करा बर आता, (दिदीला आवाज देतात)- ए दीदी पटकन तयार होऊन बाहेर ये,
आपण सगळे तुझ्या फेवरीट मॉलमध्ये जाणार आहोत.

■ आई- काय उपयोग झाला माझ्या बोलण्याचा ?
पालथ्या घड्यावर पाणी..

■ दीदी- (उत्साहात बाहेर येते) थँक्यु बाबा,
किती पटकन ओळखल तुम्ही मनातलं,
नाही तर ही आई..

■ बाबा- दीदी, आता नो कॉमेंट्स.. चलो एन्जॉय करेंगे..
(सगळे बाहेर पडतात.. इथे दृश्य संपते...)


पुढचे दृश्य..
******

एकांकिका- मायेचा ओलावा- दृश्य-३ रे
(वेळ दुपारची- दीदी आणि भाई एकाच शाळेत असल्यामुळे शाळा सुटल्यावर घरी येण्याची बस आणि वेळ एकच)

■ दीदी-
हुश्श रे बाबा- घरात आलं की किती छान वाटतं,
शाळेत पूर्णवेळ वर्गात बसून सगळं लक्षपूर्वक ऐकायचं,
पुन्हा अभ्यास करायचा ...बाप रे..!

पुढे उद्याच्या अंकात........

# ओळख साहित्यिकांची



## ॲड. प्रा. कौशिक मनोहर हरणे


मी ॲड. प्रा. कौशिक म. हरणे, पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील NMIET महाविद्यालयात एम.बी.ए. विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून माझे शिक्षण बी.सी.ए (BCA), एम.बी.ए. (MBA), एल.एल.बी (LLB), आणि एल.एल.एम (LLM) या शाखांमध्ये पूर्ण झाले आहे. मला लेखन आणि कविता करण्याचा विशेष छंद आहे. शब्दांच्या माध्यमातून विचार मांडणे, भावना व्यक्त करणे आणि समाजातील विविध विषयांवर चिंतन करणे मला फार आवडते.

"शिक्षक कभी साधारण नहीं होता, प्रलय और निर्माण उसके गोद में पलते हैं" या आचार्य चाणक्य यांच्या विचारांनी प्रभावित होऊन राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात आपलाही खारीचा वाटा असावा, या उद्देशाने मी शिक्षण क्षेत्राची निवड केली. 'राष्ट्रनिर्माण हे व्यक्तिनिर्माणातूनच घडते' आणि त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या केवळ बौद्धिक विकासावर भर देणे पुरेसे नसून, त्यांच्या नैतिक आणि मूल्याधिष्ठित विकासालाही तितकेच महत्त्व आहे. विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, जबाबदारी, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांसारखी मूल्ये कशी प्रभावीपणे रुजवता येतील, यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असतो. अध्यापन करताना केवळ अभ्यासक्रम शिकवण्यापेक्षा जीवनमूल्ये आणि व्यवहारज्ञान यांचा समन्वय साधण्यावर माझा विशेष भर असतो.

श्रीराम, श्रीकृष्णाच्या या राष्ट्रात आपण बघतो की नैतिकतेचा कसा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे, त्यामुळेच आजच्या युगातील विद्यार्थ्यांनी केवळ ज्ञानसंपन्नच नव्हे तर मूल्यसंपन्न असणेही तितकेच आवश्यक आहे. एक शिक्षक म्हणून माझी भूमिका केवळ ज्ञान देण्यापुरती मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना एक सक्षम, सजग आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडविण्याची सुद्धा आहे. म्हणूनच या भूमिकेतून कार्य करतांना मी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर, त्यांच्या आत्मविश्वास वृद्धीवर तसेच नेतृत्वगुणांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करतो. शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे आणि पैसे कमविण्याचे साधन नसून, ते आयुष्य घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असा माझा ठाम विश्वास आहे.

या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी मी सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न करतो. एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे हेच माझे अंतिम ध्येय आहे. राष्ट्रनिर्माणाच्या या पवित्र यज्ञात माझ्याकडूनही छोटीशी अहुती पडावी आणि त्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडावे, हीच माझी मनापासूनची व प्रामाणिक इच्छा आहे.

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## तुम्ही आनंदी/मोठे कधी, कसे व्हाल

प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रात काम करतो. प्रत्येकाचे कामसुध्दा वेगवेगळे असते.

पण तुम्ही जेथे, ज्या क्षेत्रात काम करता ते केवळ स्वतः पुरते मर्यादित न ठेवता सर्व समाज, जगापर्यंत पोहचले पाहीजे, हे बघा. कोणत्याही परिस्थितीत आशा, विश्वास ठेवा, वेळ, ऊर्जा व प्रेम योग्य ठिकाणी लावता आली पाहिजे. प्रत्येक अपयश हे तुम्हाला चांगले बनवते. हार व संकटे ही यशाची पायरी व शिडी मानली जाते. प्रभू राम सुध्दा 14 वर्षे रानात वनवासमधे हिंडले. त्यांना मारूती व वानर सेनेने साथ दिली व लंकापार पोहचविले.आपला आतील प्रकाश हा असा झरा आहे तो आप्त नाही. कधीतरी आपण थकतो, निराश होतो, सर्व संपले असे वाटते, तेव्हा

आत्मविश्वास हवा. मग सर्व शक्ती, ऊर्जा लावली की हा प्रकाश पुन्हा चमकतो. अशी अनेक शिक्षक, खेळाडू,विचारवंत तत्वज्ञ, व नव्वदितही सक्रिय असे जेष्ठ यांनी अडचणीवर मात करून कार्य केले! तुमची भिती मागे सोडली तर शक्ती दिसते. खरा आनंद बाह्य गोष्टीमधून येत नाही, तो आतून येतो. हिच खर्या आनंदाची किल्ली आहे म्हणून प्रयत्नशील, सकारात्मक, संयम यामुळेच आनंदी व मोठे होऊन समाज व राष्ट्राला तुम्ही काहीही देऊ शकता..

आज एवढे पुरे गुड डे, व्हेरी गुड मार्निंग... टेक केअर. मस्त राहा, स्वस्थ राहा..


# ऑनलाईन औषधोपचार




आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्ड्स् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# बिनाका गीत माला-अजरामर संगीत मालिका

**ज्योतिर्मय साहित्य**

१९७० च्या दशकात किशोरकुमार यांची गाणी-बिनाका गीतमालेत सर्वाधिक हिट गाणी होती. १९७१ मध्ये जिंदगी एक सफर है सुहाना हे किशोर कुमार-आशा भोसले यांचे गाणे अव्वल होते. १९७४ मध्ये चोर मचाओ शोर या चित्रपटा मधील चोरों का राजा चोरों का राजा हे गाणे अव्वल स्थानी होते. तसेच १९७९ साली मुकद्दर का सिकंदर या चित्रपटातील ओ साथी रे तेरे बिना हे गाणे प्रथम स्थानी होते. दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये कराओकेच्या कार्यक्रमात किशोरकुमार यांची कराओकेवर गाणी सादर झाली आणि त्यामध्ये ही गाणी ऐकण्याचा योग मला आणि रसिकांना मागील महिन्यात मिळाला. १९७० च्या दशकात बिनाका गीत मालेत शेवटचे गाणे म्हणजे पहिल्या क्रमांकावर येणारे गाणे ऐकण्यासाठी रेडिओसमोर गर्दी असायची. त्याकाळात प्रत्येक घरात रेडिओही उपलब्ध नसायचा. त्याकाळात दर बुधवारी रात्री ८ ते ९ यावेळेत मीपण माझ्या शेजारी राहणारे माझे मित्र राजू गिते यांच्या घरात जाऊन बिनाका गीत माला ऐकत असे. आज विशेषतः बॉलीवुड



सिनेमाची गाणी जुन्या पिढिच्या




ओठावर आहेत त्याला रेडिओ सिलोनची बिनाका गीतमाला ही कारणीभूत आहे. रेडिओ सिलोन भारताबाहेरचा असला तरी त्याचे प्रसारण भारतात अतिशय लोकप्रिय झाले, कारण भारतीय आकाशवाणीवर काही काळ चित्रपटगीतांवर बंधने होती आणि श्रोते पर्यायी मंच शोधत होते. त्यामुळे बिनाका गीतमाला ही केवळ एक रेडिओ मालिका न राहता, हिंदी फिल्मी संगीताची राष्ट्रीय लोकप्रियता मोजणारी आणि घडवणारी व्यासपीठ त्याकाळात बनली होती. बिनाका गीतमाला ऐकण्यासाठी लोक रेडिओशी चिकटून बसत. त्याकाळी हिंदी चित्रपटगीतांची मोठी उत्सुकता होती. रेडिओ सिलोनने हीच मागणी अचूक हेरली आणि तिचा परिणामकारक वापर झाल्याने भारतामध्ये ही बिनाका गीतमाला ऐकण्याची सांस्कृतिक सवयच बनली.

३ डिसेंबर १९५२ रोजी रेडिओ सिलोनवर बिनाका गीतमाला हा कार्यक्रम सुरू झाला आणि लगेचच लोकप्रिय झाला. बिनाका गीतमाला चालू झालेल्या कार्यक्रमाला ७५ वर्षे पूर्ण होणार आहेत. अमीन सयानी यांची खास निवेदनशैली..... ''भाइयों और बहनों'' ही ओळ, त्यांचा मृदू पण ठसकेबाज आवाज आणि आकर्षक सादरीकरण यामुळे कार्यक्रम ऐकणारे लगेच बिनाका गीतमाला या कार्यक्रमाला जोडले गेले. १९५४ पासून गाण्यांची क्रमवारी-पायदान पध्दत सुरू झाली. त्यामुळे कोणते गाणे वरच्या क्रमांकावर येईल याची उत्सुकता वाढली. रेडिओच्या इतिहासातलं अजब स्टेशन म्हणून गणले गेलेले,त्या ठिकाणाच्या प्रवासाची सुरवात ''संगिनीकडून संगीताकडे'' झालेली आहे. इंग्रजांनी कोलंबो रेडिओ स्टेशनची सुरवात १६ डिसेंबर १९२५ रोजी केली होती. दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी दक्षिण आशियाई युद्धवार्ता त्वरित व सर्वदूर मिळाव्यात म्हणून इंग्रजांनी कोलंबो रेडीओ स्टेशन मध्ये एक अत्यंत शक्तिशाली ट्रान्समीटर बसवला. या ट्रान्समीटरमुळे आशिया खंडाच्या बऱ्याच भागापर्यंत या स्टेशनवरून सांगितलेल्या बातम्या पोहचत होत्या. युद्ध संपल्यावर काही काळाने श्रीलंका देश स्वतंत्र झाला. भारतही १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. काही कालावधीनंतर हिंदी गाणी अभिरुचीहीन असतात म्हणून त्या काळात ऑल इंडिया रोडओवरून चित्रपट गाणी वाजवायला बंदी घातली गेली. **(क्रमशः)**

# 'शांतेचं कार्टं चालू आहे' पुन्हा रंगभूमीवर

**ज्योतिर्मय साहित्य**

रंगभूमीवर काही नाटकं अशी असतात, जी प्रेक्षकांच्या मनात कायम घर करून राहातात. शांतेचं कार्टं चालू आहे हे असंच एक गाजलेलं आणि आवडतं नाटक आता पुन्हा एकदा रंगभूमीवर परतत आहे. काही काळ विश्रांतीनंतर हे नाटक नव्या उत्साहात पुन्हा सादर होत असून, येत्या ११ एप्रिल रोजी प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिर येथे त्याचा प्रयोग रंगणार आहे.




अमेय विनोद खोपकर सादर करत असलेलं हे नाटक, एव्हीके पिक्चर्स आणि सीजी ग्रुप यांच्या निर्मितीतून साकारलं आहे. दिग्दर्शक विजय केंकरे यांच्या नेटक्या दिग्दर्शनातून आणि लेखक श्रीनिवास भणगे यांच्या खुसखुशीत लेखणीतून उभं राहिलेलं हे नाटक प्रेक्षकांना पोट धरून हसवतानाच जीवनातील नातेसंबंधांवरही भाष्य करतं. संगीतकार अजित परब यांच्या सुरांनी नाटकात अधिकच रंगत आणली असून स्वाती खोपकर, दिनेश खंडागळे आणि निनाद नं बत्तीन या नाटकाचे निर्माते आहेत. यात प्रियदर्शन जाधव, विक्रांत कोळपे, सुकन्या काळण, राजेश चिटणीस, प्रदीप जोशी, मयुरा रानडे आणि विशाखा सुभेदार यांसारखी लोकप्रिय कलाकारांची फळी पाहायला मिळणार आहे.

कुटुंबातील छोट्या-मोठ्या प्रसंगांमधून उलगडणारे नातेसंबंध, त्यातील गंमती-जंमती, गैरसमज आणि आपुलकी यांचा हलकाफुलका वेध या नाटकातून घेतला जातो. त्यामुळेच हे नाटक प्रेक्षकांना हसवतानाच आपलंसंही वाटतं. पूर्णपणे कौटुंबिक स्वरूपाचं असल्यामुळे, हे नाटक सगळ्यांनी एकत्र बसून पाहाण्यासारखं आहे.

दिग्दर्शक विजय केंकरे म्हणतात, रंगभूमी ही जिवंत माध्यम आहे. प्रेक्षकांचा श्वास, त्यांचं हसणं आणि त्यांच्या प्रतिक्रिया यामुळे प्रत्येक प्रयोग नव्याने घडतो. 'शांतेचं कार्टं चालू आहे' हे नाटक पुन्हा सादर करताना आम्ही त्यात आजच्या काळाची झलक आणि अधिक परिपक्वता आणण्याचा प्रयत्न केला आहे. हे नाटक प्रेक्षकांना केवळ हसवणार नाही, तर त्यांच्या मनात दीर्घकाळ ठसा उमटवेल.

निर्माते अमेय विनोद खोपकर म्हणतात, चांगल्या आशयाला वेळेची मर्यादा नसते. हे नाटक आधी गाजलं कारण त्यात प्रामाणिकपणा होता आणि आजही तो तितकाच जिवंत आहे. नव्या पिढीसाठी आणि जुन्या रसिकांसाठी आम्ही हे नाटक नव्या उर्जेसह सादर करत आहोत. प्रेक्षकांनी पुन्हा एकदा रंगभूमीचा आनंद घ्यावा, हीच आमची इच्छा. निर्माते दिनेश खंडागळे म्हणतात, अशा दर्जेदार नाटकाची निर्मिती करत असल्याचा मला मनापासून आनंद आहे. चांगल्या आशयाच्या प्रकल्पातूनच निर्मिती क्षेत्रात पदार्पण करावं, असं नेहमी वाटत होतं आणि ते या नाटकाच्या निमित्ताने साध्य झालं. या नाटकाची संपूर्ण टीम अतिशय उत्तम आहे. नाटकाला आधीपासूनच प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे, त्यामुळे अशा लोकप्रिय नाटकाचा भाग होता येत असल्याचा मला विशेष आनंद आहे. एकूणच, हास्य आणि भावनांचा समतोल साधणारं 'शांतेचं कार्टं चालू आहे' हे नाटक पुन्हा एकदा रंगभूमीवर आपली छाप पाडण्यासाठी सज्ज झालं आहे. त्यामुळे या उन्हाळ्याच्या सुट्टीत नाट्यरसिकांना कुटुंबासोबत हलकंफुलकं आणि दर्जेदार मनोरंजन अनुभवायला मिळणार आहे.

# खुशाली

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

''काय लिहिले व लेकरांन? खुशाल हाए ना तो?''

तिने विचारलं, ''खुशालच असेल ना ,, अगं येडे बंद पत्र कळाना होय तुला,?''

तो तिला लडिवाळपणे म्हणाला.

''आव मग वाचून घ्यायचं ना त्याच्याकडून काय लिहिलं कोणास ठाऊक? जीव पांगला बघा माझा'' ती काळजीने म्हणाली. ''सकाळी पारावर जाऊन वाचून घेतो कुणाकडून मग तर झालं!निज आता दमली असशील, नगं काळजी करू, खुशालच असेल तो''

बायकोला धीर देत हरी ते पत्र उशाशी ठेवून झोपी गेला. पहाटे लवकरच आंघोळ करून पाराकडे निघाला. पत्र अंगातील बंडीच्या खिशात होतच. दोन-चार बिड्या ओढणारे त्याच्या वयाचेच कधी पाटी हाती न घेतलेले त्याला पारावर बसलेली दिसले. एवढ्यात शाळेचे गुरुजी येताना दिसले एका हाताने धोत्राचा कोसा पकडून ऐटीत चालणारे, अंगात कोट, एका हातात कापडी पिशवी असलेले .

त्यांना पाहताच हरीचे डोळे चमकले. धावतच तो त्यांना आडवा झाला,''राम राम गुरुजी! ''

''राम राम ! काय हरी कसा आहेस? '' गुरुजींनी विचारले




''मी बरा आहे हो, तुम्ही कसं काय? ''

''मी छानच आहे ! काय रे? असा कावराबावरा का बघतोस? काही काम होतं का? ''

त्याची नम्रता बघून गुरुजींनी विचारले

''व्हय लेकराचे पत्र आलय मुंबईहून, आम्हा येड्यांना वाचता येतय व्हय?तेवढ वाचून दाखवा की गुरुजी, लय उपकार होतील बघा'' हात जोडून हरी गुरुजींना म्हणाला, गुरुजी हसून म्हणाले, ''अरे एवढंच ना! चल शाळेत, निवांत बसून तुला वाचून दाखवतो. मग तर झालं!




''

हरीला आभाळ दोन बोटच उरलं होतं. तो गुरुजींच्या मागे मागे शाळेपर्यंत पोहोचला. व्हरांड्यात ते एका लाकडी खुर्चीवर बसत म्हणाले, ''आण ते पत्र इकडे, बघू काय लिहिले ते?''

बंडीच्या खिशातलं पत्र दोन्ही हातांनी मोठ्या आदबीने हरीने गुरुजींना दिलं. गुरुजींनी पत्र फोडल आणि वाचू लागले,

''तीर्थरूप आई बाबा मी खुशाल आहे,,,!

एवढे शब्द कानी पडतात हरीचे डोळे भरून आले!

''काळजी करू नका, पाचशे रुपये मनी ऑर्डर पाठवत आहे, पुढच्या आठवड्यात मिळतील. जास्त काम करत जाऊ नका. आईची काळजी घ्या. मी खुशाल आहे.

तुमचा मुलगा
निवृत्ती. ''

पुन्हा खुशाली हा शब्द ऐकताच हरी गुरुजीचे हात हातात धरून ढसाढसा रडू लागला.

दुसऱ्या दिवशी गुरुजी जेव्हा घरी गेले तेव्हा अंगणात गाडीभर वाळलेले सरपण आणून टाकलेलं दिसलं. घरी विचारपूस केल्यावर कळलं की हरीने आणून टाकलं होतं.

***

# लोककलांचे अभ्यासक - प्रतिभावंत कवी अशोक जी परांजपे

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

१९७८ साली इंडियन नॅशनल थिएटर (आय एन टी) मध्ये लोककला विभागाचे संचालक पद त्यांना मिळाले. लोककलावंतात रमणारे अशोक जी लोककला आणि लोक-कलाकारात, आत नेहमीच नाविण्याचा शोध घेत असत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी लोककलावर आधारित संशोधन नाट्ये मराठी रंगभूमीवर आणली. दशावतारी राजा, वासुदेव सांगतो जांभूळ आख्यान, खंडोबाचं लगीन, आतून कीर्तन वरुन तमाशा, लोकनाट्ये आय.एन.टी. ने अशोकजीनच्या संकल्पनेतून सादर केली. त्यांनी लोककला लोकगीते लावण्यांचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी ग्रामीण भागात भरपूर भ्रमंती केली.

लोककला लोककलावंतांचा शोध घेतला. ग्रामीण कलावंतांचे अनेक कार्यक्रम मुंबईत सादर करून त्यांना उत्साहित प्रोत्साहित केले. त्यात परभणीचे गोंधळी राजाभाऊ कदम, शाहीर विभुते, दशावतारी वारली चित्रकार अशा अनेक कलाकारांना त्यांनी पुढे आणले. ते नेहमीच म्हणायचे आपले काम प्रतिष्ठातां,सारखे नाही, पण तळागाळातल्या कलांना आणि कलाकारांना प्रतिष्ठा मिळवून देणारे नक्कीच आहे. दार उघड बया दार उघड, बुद्ध इथे हसला , संत गोरा कुंभार, अबक दुबक, संत




कान्होपात्रा, ही नाटके त्यांनी लिहिली . लोककलांमध्ये रमणारा कलाकारांसाठी सतत झटणारा असा हा प्रतिभावंत कलाकार होता. आय एन टी मध्ये कार्यरत असताना त्यांनी १९८२ मध्ये पंढरपूरला भक्ती संगीत महोत्सव आणि १९८५ मध्ये आनंदवनला महाराष्ट्र आदिवासी कला महोत्सव आयोजित केले होते. सर्व विचारवंत कलाकारांना एकत्रित आणले. त्यांच्या कार्याची नोंद फोर्ड फाऊंडेशन ने घेतली. आंतरराष्ट्रीय लोककला संस्था आय ओ व्ही चे सदस्यत्व यांना मिळाले. या माध्यमातून त्यांनी अनेक लोक कलावंतांना परदेशात जपान. फ्रान्स. आयर्लंड. मध्ये आपली लोककला सादरीकरणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्यात निर्मिती केली. सांगली जिल्ह्यातील हरिपूर चे असलेले अशोक जी नंतरच्या काळात शांतपणे जीवन व्यतीत करण्यासाठी मुंबई सोडून औरंगाबादेत आले. पण काय कोण जाणे हा प्रतिभावंत कलाकार ९ एप्रिल २००९ रोजी एका वेगळ्या वाटेने रसिकांच्या मनाला चटका लावून निघून गेला. त्यांची गीते, कलाकृती आपल्यासाठी मागे ठेवून..

# मानवाची वाटचाल शून्यातून पून्हा शून्याकडे...

**ज्योतिर्मय साहित्य**


(मागील अंकावरून)

याबाबतच्या बातम्या अनेक दैनंदिन वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होत असतात. सध्याच्या एकविसाव्या शतकात नियम हा शब्द


तसेच, माणुसकी हा शब्द माणसाच्या जीवनावर जगण्याच्या शब्दकोषातून हद्दपार झाले आहेत असेच म्हणावे लागेल. कारण नियम,कायदे बनविणारे तसेच, नियमानुसार लोक त्याप्रमाणे वागतात का! अंमलबजावणी करणारे त्याची नीट अंमलबजावणी करतात का याचे सर्वेक्षण केले असता झालेल्या सर्वे क्षणातून फार धक्कादायक माहिती निदर्शनास आली आहे. या जगातील विशेषतः भारतातील त्यातल्यात्यात महाराष्ट्रातील जनतेचे जीवन खूपंच अस्थिर झाले आहे. महाराष्ट्रात पुणे आणि मुंबईमध्ये वातावरणात आणि जीवनमानात अनाकलनीय असा बदल झाला आहे. तसेच, शतकानुशतकांच्या चालू असलेल्या निसर्गाच्या नैसर्गिक वातावरणामध्ये

व रचनेमध्ये बदल झालेला आहे. हा बदल काही दूष्ट प्रवृत्तीच्या, स्वार्थी आणि घातकी माणसांच्या दूष्कृत्यांमुळे चांगल्या माणसांच्या

आणि निसर्गाच्या सुरळीतपणे चालणा-या जीवनावर दूष्परिणाम झाला आहे. त्यामुळे, सर्वसामान्य माणसांना त्यांचे जीवन जगणे खूप कठीण झाले आहे.जागतिक, आंतरराष्ट्रीय स्तरावरही अनेक मोठे देश, त्यांचे सत्ताधीश दूस-या देशांवर अधिराज्य गाजवण्यासाठी व स्वतःची सत्ता तिथे स्थापन करण्यासाठी त्या देशावर प्राणघातक हल्ले करुन युद्ध करीत आहेत. याचा परिणाम त्या त्या देशांतील निरपराध जनतेवर होत आहे. यात हजारों निष्पाप नागरिक मारले जात आहेत. याचा विचार त्या राक्षसीवृत्तीच्या त्या देशांतील सत्ताधीशांनी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी, सर्वांनी विश्वाच्या शांततेसाठी, कल्याणासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.युध्दातील अतिविनाशकारक शस्त्रास्त्रांमुळे निसर्गाचे ही पर्यावरण संतुलन खूप मोठ्या प्रमाणात बदलले गेले आहे. याचे अत्यंत महत्त्वाचे एकच कारण आहे. ते म्हणजे एकविसाव्या शतकातील अत्यंत स्वार्थीवृत्तीने पैशांच्या आत्यंतिक अतिलालसेंने कोट्यावधी, अब्जावधी रुपये



मिळविण्याच्या अतिमोहामुळे जगातील निष्पाप, निरपराध माणसांचे जीवन, आयुष्य धोकादायक वळणावर येऊन ठेपले आहे. याला कारणीभूत हीच दूष्ट, कृतघ्न, राक्षसांपेक्षाही महाक्रूर दुष्कृत्ये करणारी माणसांचं कातडं पांघरलेली राक्षसी माणसं आहेत. तसेच, अशा माणसांची संख्या जगात! नव्हे भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात वाढत आहे. अशी राक्षसी माणसं महाराष्ट्राला, महाराष्ट्राच्या संस्कृतीला कलंक आहेत. ही महाराष्ट्राची भूमी अनेक थोर संतांची भूमी आहे. या थोर पवित्र भूमीवर अनेक थोर संतांचा जन्म झाला आहे. सर्व संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराजांनी विश्वाच्या कल्याणासाठी सर्व चराचर सृष्टीच्या कल्याणासाठी, अखिल विश्वाच्या शांतीसाठी, सुखसमाधानासाठी अमृतासारखा थोर अजरामर असा श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला. अखिल विश्वाच्या सुखशांतीसाठी विश्वात्मक देवाला ''पसायदान'' मागितले. जगद्गुरु थोर संत श्री तुकाराम महाराजांनी थोर ग्रंथ ''तुकाराम गाथा'' लिहिला. त्या काळातील दुर्जन लोकांनी या संतांना खूपंच त्रास दिला. तरीही त्यांनी सर्व जनांच्या कल्याणाचेच सत्कार्य केले. अशा ह्या थोर, पवित्र महाराष्ट्रात अनेक क्रूर घटना घडल्या आहेत. घडत आहेत. अनेक क्रूर दूष्कृत्ये होत आहेत. अगणित प्रमाणात जंगलतोड, मोठमोठे वृक्षतोड होत आहे. लाखों, कोट्यावधी दोनचाकी, चारचाकी वाहनांचे, ट्रक, टेंपो, ट्रॅक्टरट्रॉली, ट्रॅव्हल्स इत्यादी वाहनांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच, त्या वाहनांमधून निघणा-या धूराची गुणवत्ता वेळच्यावेळी तपासली जात नाही. काळ्याभोर धूर सोडणारी असंख्य हलकी वाहने, जड वाहने शहरातील रस्त्यांवरुन, राज्य महामार्गावरुन अविरतपणे धावत असतात. त्यामुळेच, त्यांच्या वाहनांमधून अत्यंत जास्त प्रमाणात कार्बनडाय ऑक्साइड हा अतिघातक वायू उत्सर्जनाने वातावरणात मिसळतअसतो. त्यामुळेंच, निसर्गाचे व पर्यावरणाचे पर्यायाने पृथ्वीचे संतुलन बिघडले आहे. बदलले आहे. त्याकारणानेच जवळपास बारमाही असल्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात अवकाळी पाऊस पडत आहे. याला कारणीभूतही ही दूष्ट, कृतघ्न व राक्षसी दूष्कृत्ये करणारी अवकाळी माणसेंच आहेत. या अशा अवकाळी माणसांमुळेंच दरवर्षी जागतिक तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसने वाढ होत आहे. महाराष्ट्रातही सन २०२५ मध्ये एप्रिल, मे मध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअस झाले होते. आता यावर्षी सन २०२६ मध्ये हवामान खात्याने एप्रिलच्या शेवटी व मे महिन्यात तापमान ५० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षाही जास्त तापमान वाढीचा इशारा दिला आहे. याचा राज्य तसेच, केंद्र शासनाने अत्यंत गांभीर्याने विचार करुन त्यावर अत्यंत उपयोगी व सर्व जनतेला सुखदायक होईल अशी परिणामकारक उपाययोजना तयार त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याची जबाबदारी ज्या त्या राज्य शासनाने व त्यांच्या यंत्रणांनी घेतल्यास एकमेकांच्या समन्वयाने हे कार्य चांगल्याप्रकारे पार पडू शकेल यात शंकाच नाही.




फक्त त्याबरोबरच विघातक दूष्कृत्ये करणा-या तसेच, पृथ्वीचे, पर्यावरणाचे व निसर्गाचे संतुलन बदलविणा-या गुन्हेगारी दूष्कृत्ये करणा-या व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर अत्यंत कडक कारवाई केल्यासंच, पृथ्वीचे, निसर्गाचे व पर्यावरणाचे संतुलन स्थिर राहील. त्यामुळे, संपुर्ण जगात सुख, शांतता व समाधान राहील. जय हिंद! जय महाराष्ट्र! जय भारतमाता ! जय विश्व!

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559